FORM-1 A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे र.का.प्रा.वि., पहिली खबर क्र. ०५, वर्ष २०१९, दिनांक २८/०९/२०१९
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act ल. अत्याचार प्रति. अधि. १९८९, कलमे Sections —
(ii) अधिनियम Act (सुधारित २०१८), कलमे Sections —
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून २३/०९/१९, वेळ ......, तारीख पर्यंत २८/०९/१९, वेळ ११:३० वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २३/०९/१९, वेळ १०:१५
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ५४, तारीख २८/०९/१९, वेळ २३:५०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव डॉ. आंबेडकर, ठिकाणाचे नंबर रुग्णालय, गल्ली मोटेगांव, रस्त्याचे नाव समोर
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण कमला नेहरू मार्ग, कांदिवली (प.), मुंबई नं. ४०००६७, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name प्रकाश मनवर (b) वडीलांचे / पतीचे नाव निवाजी मनवर
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ५० वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ......
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय मेकॅनिक
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता : सदानंद, गल्ली / सर्वे नं. नगर, घर / नाव नंबर रेवा आश्रम, फोन / मो. नंबर मुर्धा गांव, पॅन नं. ......, ओळख नं. ......
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव उत्तन रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण भाईंदर (प.), गाव जि. पालघर, पोस्ट ......, पो. स्टे. ......
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ......, जिल्हा पालघर, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता ......
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
आकाश आण्णा देशमुख, वय २६ वर्षे, धंदा - सफाई कामगार (डॉ. आंबेडकर म.न.पा. सर्वसाधारण रुग्णालय, कांदिवली (प.) मुंबई) रा. ठि. रूम नं. १६१, टेंभोडे गांव, मावदेवी मंदीराजवळ, मुंबई - अहमदाबाद रोड, वज्रेश्वरी मार्ग, जि. पालघर.

फिर्यादी श्री प्रकाश शिवाजी मनवर, वय ५० वर्षे
धंदा - टेलर, रा. ठि. सदानंद नगर, मुर्धा गाव, उत्तन रोड,
भाईन्दर (प) जि. पालघर यांची सविस्तर फिर्यादी
जबाब स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आला असून
तो सोबत जोडण्यात आला आहे.

मी स्वत:

(signature)

(नानाजी करपे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुं.

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..................
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ..................
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..................
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.
खालील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे हर्नियाचे ऑपरेशन करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथे दि. ०६/०४/२०२४ ची तारीख दिली होती. खालील आरोपी यांनी फिर्यादी यांचा ऑपरेशन लवकरात लवकर करून देण्याकरीता रु. ६,०००/- इतक्या रोख रक्कमेची बेकायदेशीर पारिश्रमिकेतर पारितोषण म्हणून मागणी केली व सदरची रक्कम फिर्यादी यांचेकडून स्विकारली म्हणून गुन्हा कलम ७ भ्रष्टाचार प्रति. अधि. १९८८ (सुधारित २०१८) अन्वये नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................., जिल्हा .................., राज्य ..................,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..................
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................. (3) Transferred to P.S ..................,
District .................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

प्रकाश

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ....शिवाजी करपे,
पदनाम Rank ....सहाय्यक पोलीस आयुक्त,
तपासिक अं. चा कोड. क्र. ..................
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.
Code No. of I. O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

जबाब दि.२४/०१/२०१९

श्री.प्रकाश लिंबाजी मनवर वय ५० वर्षे, रा.ठी. ३, सदानंद नगर रेव आगर, उत्तन रोड, मुर्धा गाव, भाईंदर पश्चिम, ठाणे ४०११०१ मो. ९६७९९४९९६५.

---

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्यावर गेल्या १० वर्षापासुन राहण्यास आहे. सदर ठिकाणी मी माझे कुटुंबियांसमवेत राहण्यास आहे. मी गेल्या २० वर्षापासुन प्लंबरचे काम करीत असुन त्यातुन येणाऱ्या उत्पन्नातुन मी माझा व माझ्या कुटुंबाचा उदारनिर्वाह होतो.

मला गेल्या वर्षभरापासुन पोटात दुखत होते त्यामुळे मी खाजगी रूग्णालयात उपचार चालु होते. परंतु मला होणार त्रास कमी होत नसल्याने मी कांदीवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जनरल हॉस्पिटल, कांदीवली, मुंबई येथे महिनाभरापुर्वी उपचार सुरू केला होता. दि.२१/०१/२०१९ रोजी उपचार करण्याकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल येथे आलो असता तेथील ओ.पी.डी. येथील डॉक्टर यांनी रिपोर्टची पाहणी करून मला हर्नियाची गाठ असल्याचे सांगुन शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी मला संबधित डॉक्टर यांनी शस्त्रक्रियेची ६ एप्रिल २०१९ हि तारीख दिली. त्यानंतर मी ओ.पी.डी. येथुन बाहेर आलो असता माझे पाठीमागुन एक मुलगा आला व त्याने मला " काका तुमचे ऑपरेशन करायच का लवकर " अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यास " डॉक्टरांनी तीन महिन्यानंतरची तारीख दिलेली आहे, तुम्ही कसे करणार ? " अशी विचारणा केली असता त्यांनी मला " मी हॉस्पिटलमध्येच काम करतो तुम्ही ६००० रूपये दिल्यास लवकरत लवकर तुमचे ऑपरेशन करवून घेतो ". असे सांगितले. त्यानंतर त्याने मला स्वत:चा मोबाईल नंबर देवुन त्यांचे नाव आकाश देशमुख असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर दि.२२/०१/२०१९ रोजी सदर आकाश देशमुख याने त्याचा मोबाईल नं. ७२७६७०१६८० या नंबरवरून माझे वरील नंबरवर वारंवार कॉल करून मला मी कुठे असल्याचे विचारून पैशाबाबत विचारणा केली व ऑपरेशन लवकर करायचे असल्यास लवकर पैसे घेवुन या. असे सांगितले. माझी सदर इसमास लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.२३/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सपोआ करपे यांनी तक्रारीची पडताळणी करणार असल्याचे सांगितले. दि.२३/०१/२०१९ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान श्री.आकाश देशमुख यांनी माझेकडे रू.६०००/- चे लाचेची मागणी केली व लाचेच्या रकमेची व्यवस्था झाल्यावर फोन करण्यास सांगितले. मी रू.६०००/- ची व्यवस्था केलेनंतर सपोआ करपे यांनी तात्काळ सापळा कारवाईचे आयोजन केले. सदर सापळा कारवाई दरम्यान श्री.आकाश देशमुख यास लाचेची रक्कम देणेकरीता भेट घेतली असता त्यांनी त्या ठिकाणी पैसे घेण्यास नकार देवुन हॉस्पिटलच्या गेटच्या बाहेर पैसे देण्याबाबत सांगितले. तो मला घेवुन बाहेर आला. परंतु त्यांनी त्या दिवशी माझेकडुन लाचेची रक्कम घेतली नाही.

दि.२४/०१/२०१९ रोजी मला पुन्हा पोटदुखीचा त्रास होवु लागल्याने मी डॉ बाबासाहेब आंबेडकर जनरल हॉस्पिटल येथे उपचाराकरीता आलो होतो. सुमारे ०९.१५ वाजताचे दरम्यान श्री.आकाश देशमुख हे मला भेटले व त्यांनी माझेकडे पुर्वी मागणी केलेल्या पैशाबाबत विचारणा करून लाचेची रक्कम आणण्यास सांगितले. मी त्यावेळी त्याच्याकडे वेळमागुन सपोआ करपे यांना त्यांचे कार्यालयात संपर्क साधुन श्री.आकाश देशमुख हे पैशाची मागणी करीत असल्याबाबत सांगितले असता त्यांनी पथकासह कांदीवली येथे येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर सपोआ करपे व सापळा पथक हॉस्पिटल परिसरात आले व सपोआ करपे यांनी पुन्हा सापळा कारवाईचे आयोजन केले. सदर सापळा कारवाई दरम्यान श्री.आकाश देशमुख यांची हॉस्पिटलमध्ये भेट घेतली असता ते मला हॉस्पिटलच्या गेटच्या बाहेर घेवुन आले व माझेकडुन लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली असता मी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा दिला. त्यानंतर सापळा पथकाने श्री.आकाश देशमुख यांस लाचेची रक्कम घेतल्यानंतर रंगेहाथ पकडले.

तरी माझे हर्नियां आजारावर डॉ.बाबासाहेबर आंबेडकर जनरल हॉस्पिटल येथे लवकरात लवकर शस्त्रक्रिया करवुन घेण्यासाठी आकाश देशमुख यांनी माझेकडे दि. २३/०१/२०१९ रोजी लाचेची मागणी करून दि.२४/०१/२०१९ रोजी स्विकारली. तरी माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणीकृत केला असुन तो मला वाचुन व समजावुन सांगितला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

Karpe

प्रकाश

( तानाजी करपे ).
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई